...ते असून आरएसएसने त्यांचा ...कार करावा, अशी प्रतिक्रिया सर्वत्र ...क्त होत आहे. यामुळे ...आरएसएसमध्ये खळबळ उडाली आहे.



# अमेरिकेत धम्मचक्र प्रवर्तनदिनाचा कार्यक्रम

## ३० ऑक्टोबरला मिशीगनमध्ये शानदार सोहळा

**मिशीगन/वृत्तसंस्था**

धम्मचक्र प्रवर्तनदिनाची महती सातासमुद्रापार पोहोचली आहे. 'आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका' या अनिवासी भारतीय मागासवर्गीयांच्या संघटनेने धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त अमेरिकेच्या मिशीगन शहरात ३० ऑक्टोबर रोजी एक कार्यक्रम आयोजित केला आहे.

हा कार्यक्रम इन लिव्होनिया, ३६६५५, प्लायमाऊथ रोड, लिव्होनिया, मिशीगन येथे शनिवार ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते १० या वेळेत होईल. या कार्यक्रमात 'आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका'चे शेकडो कार्यकर्ते उपस्थित राहतील, अशी माहिती संघटनेचे महेश वासनिक यांनी दिली.

दरम्यान, मिशीगन विद्यापीठाच्या आवारात मोहनदास गांधी यांचा पुतळा बसविण्याविरोधात 'आंबेडकर असोसिएशन ऑर्फ नॉर्थ अमेरिका' या संघटनेने मिशीगनमध्ये ३ ऑक्टोबर रोजी जोरदार आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांना घ्यावी लागली होती. मिशीगनप्रमाणेच अमेरिकेच्या अनेक शहरांत गांधीविरोधात आंदोलन करण्यात आले होते. मिशीगन विद्यापीठात गांधीचा पुतळा उभारण्यास विरोध करून तेथील मागासवर्गीयांनी पहिली लढाई जिंकली आहे. आता याच मिशीगनमध्ये धम्मचक्र प्रवर्तनदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याने सर्वांच्या नजरा या कार्यक्रमाकडे लागल्या आहेत.